# प्रकरण - पहिले

## विषय : हायकू : एका काव्य प्रकाराचा अभ्यास

# प्रकरण - पहिले

## हायकू : घटना आणि परंपरा

काव्य हा मराठीतील एक समृद्ध वाङ्मय प्रकार आहे. इतर कोणत्याही वाड:मय प्रकारापेक्षा मराठी काव्याला फार मोठी परंपरा आहे. मराठी साहित्यात प्रारंभीची रचना गद्यापेक्षा पद्यातच अधिक आढळते. इ. स. ११०० पासून इ.स. १८०० पर्यंतच्या कालखंडास प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंड असे म्हटले जाते. महानुभावाचे गद्य वाड:मय आणि बखर गद्य या दोन प्रकारांचा अपवाद वगळता त्या कालखंडात पद्यातच रचना झाली. इ. स. १८१८ नंतर इंग्रजांचे आगमन झाले. एका भिन्न वंशाच्या भिन्न संस्कृतीच्या व भिन्न भाषेच्या समाजाची सबंध भारतात आणि महाराष्ट्रातही राज्य सत्ता आली आणि एका नव्या युगाला आरंभ झाला. या कालखंडाला नवे युग म्हणायचे कारण, समाज जीवनात अनेक नव्या गोष्टी आल्याने परिवर्तन घडू लागले. इंग्रजानी येथे सर्व समाजासाठी शाळा काढल्या, शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. इंग्रजी भाषा इंग्रजी साहित्य, इंग्रजीतील वैचारिक ग्रंथ यांचा अभ्यास होऊ लागला. वृत्तपत्रे निघाली. ग्रंथनिर्मिती होऊ लागली. रेल्वे, टेलिफोन, वीज, मोटारगाड्या अशी वैज्ञानिक साधने येऊ लागली. त्यामुळे समाज जीवनात झपाट्याने परिवर्तन होऊ लागले. विशेषत: १८८५ ते १९२० या कालखंडात हे परिवर्तन क्रांतीस्वरुपाचे असल्याने या कालखंडाला ' क्रांतीकालखंड ' असे म्हटले जाते. त्याचा परिणाम साहित्यावरही होऊ लागला. कारण Literature is the reflection of life (साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब होय) समाज बदलला तसे साहित्यही बदलू लागले. त्याचा काव्यनिर्मितीवरही परिणाम होऊ लागला आणि मराठी काव्याचे स्वरुप बदलू लागले. ही बदलाची प्रक्रिया सातत्याने चालू राहिली.

वरील स्वरुप पाहता असे दिसून येते की, मराठी काव्याचे मुख्य दोन काव्यखंड दिसून येतात.

१) प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंड - ११०० ते १८००

२) आधुनिक कालखंड - १८०० ते २०००

या कालखंडामध्ये विविध प्रवृत्तींचे काव्य संप्रदाय निर्माण झाले. या निर्मितीमध्ये अनुकरणाचा फार मोठा वाटा होता. याचा अर्थ मराठी काव्यामध्ये स्वतंत्रता नव्हती, मराठी काव्य परभृत होते असे नाही. त्यामध्ये स्वतंत्र अनुभवाची स्वतंत्र अभिव्यक्तीही होती. संस्कृत, प्राकृत व इंग्रजी या भाषेतून मराठीने बरेचसे ऋण घेतले. त्यातील काव्यप्रकारांचे अनुकरण केले. हे अनुकरण काहीवेळेला सामान्य स्वरुपाचे असले तरी पुढे त्या भाषांमधील काव्यप्रकारांची वैशिष्ट्ये पचवून मराठीने आपल्या स्वतंत्रपणा सिद्ध केला केला. साहित्य विकासामध्ये ही एक स्वाभाविक प्रक्रिया असल्याने तिला नावे ठेवण्याचे किंवा तिच्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. फक्त एवढे च सूचित करावयाचे आहे की, मराठीने विविध भाषांपासून प्रेरणा घेतल्या, अनुकरण केले आणि काव्यक्षेत्र समृध्द करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मराठीत विविध विषयांची, विविध पध्दतीने अभिव्यक्ती झाली. मराठी कवितेतील आशय बदलला, अभिव्यक्ती बदलली, त्यामुळे विविध आशय व अभिव्यक्ती असलेले काव्य संप्रदाय निर्माण झाले. ते खालील प्रमाणे -

**अ) प्राचीन कालखंड -**

१) संत काव्य

२) पंडिती काव्य

३) शाहिरी काव्य

ब) आधुनिक कालखंड -

१) केशवसुत संप्रदाय

२) रविकिरण मंडळाची कविता

३) नवकाव्य

४) दलित काव्य

५) ग्रामीण काव्य

या वेगवेगळ्या काव्य प्रवाहांचा मागोवा घेताना असे दिसून येते की, यातील प्रत्येक प्रवाहाचे आशय व अभिव्यक्तिच्या दृष्टीने स्वत:चे म्हणून काही वैशिष्ट्ये असून त्या वैशिष्ट्यांचा मागोवा घेताना असे दिसून येते की, वेगवेगळ्या कालखंडात हे जे काव्यप्रकार निर्माण झाले. त्यातील कवींनी इतर भाषेतील काव्यप्रकारांतून प्रेरणा घेतली. अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. स्वतंत्र रचना करुन प्रयोगशीलता दाखविली. अनुकरणशीलता व प्रयोगशीलता यातून मराठी काव्याचा विकास होत गेला. हे अनुकरण आशयाच्याबाबतीत होते. तसेच अभिव्यक्तीच्या बाबतीतही होते. हे पुढील चर्चेवरुन दिसून येईल.

१) अ) **प्राचीन कालखंड -**

प्राचीन काळातील पहिला समृध्द काव्यप्रवाह म्हणजे संतकाव्य होय. संत कवीनी अभंग ओवी, भारुड, बालक्रीडा अशा काव्यप्रकारात भक्तीविचारांचा आविष्कार केला. हे करताना त्यांनी लोकभाषेतून अभिव्यक्ती केली. पंडित कवीनी संस्कृत मधील महाकाव्य, आख्यान काव्य यांच्या आधारे मराठीतून रचना केली. त्यानंतर आपणास शाहिरीकाव्याची निर्मिती आढळते. शाहीर कवींनी लौकिक व ऐतिहासिक जीवन प्रसंग घेऊन वीर व शृंगार रसातून

रचना केली. या रचना करता त्यांनी पोवाडा व लावणी हे काव्य प्रकार मराठीत आणले व लोकप्रिय केले. आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीने हे प्रयोग करुन प्राचीन कालखंडातील कवीनीं मराठी कवितेचा विकास केला.

ब) **आधुनिक कालखंड -**

इंग्रजांच्या आगमनाने महाराष्ट्रात एका नव्या युगाचा आरंभ सुरु झाला. महाराष्ट्रातील सुशिक्षित लोकांच्या वाचनात इंग्रजी वाङमय येऊ लागले. इ. स. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळे मराठी युवकांना इंग्रजी वाङमयाची ओळख झाली. हे इंग्रजी वाङमय प्रामुख्याने 'रोमॅन्टिसिझम' म्हणजे स्वच्छंदवाद अथवा 'सौंदर्यवाद' परंपरेतील होते. हे साहित्य आत्मनिष्ठ स्वरुपाचे आणि लौकिक जीवनावरचे होते. त्यातून भावगीत, नाट्यगीत, विलापिका,सुनित यासारखे काव्यप्रकार येऊ लागले. प्रारंभी भाषांतराच्या स्वरुपात नंतर स्वतंत्र स्वरुपात काव्यनिर्मिती होऊ लागली आणि मराठी कवितेने नवे व आधुनिक रुप घेतले. रविकिरण मंडळाच्या कालखंडात खंडकाव्यासारखा आणखी एक काव्यप्रकार सुरु झाला. मर्ढेकरांच्या काळात यंत्रप्रधान व अर्थ प्रधान संस्कृतीमध्ये मानवाची होणारी कुचंबणा एका नव्या पध्दतीने आविष्कृत होऊ लागली. यातून नवकविता जन्माला आली. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत नवकाव्यावर इंग्रजी काव्याचा परिणाम होत होता. अलिकडेच अरबी, फारसी भाषेतून उर्दू भाषेत आलेले शेर - शायरी, गझल हे काव्य प्रकार मराठीने स्विकारले आणि मराठीत उत्कृष्ठ प्रकारचे गझल काव्य निर्माण झाले.

या विवेचनावरुन असे दिसून येते की, मराठी काव्याने आपल्या काव्यरचनेच्या विकासात प्राकृत, संस्कृत इंग्रजी, अरबी, फारसी या भाषांचे अनुकरण करीत करीत कवितेचा विकास साधला. परंतु जगामध्ये संपन्न देशांच्या संपन्न भाषा असताना त्यांच्या साहित्याचे मात्र अनुकरण केले नाही. जर्मन, रशिया, चीन, जपान या राष्ट्रांमध्ये वेगवेगळे वाङमय प्रकार वैशिष्ठपूर्ण असताना त्यांचा अभ्यास करुन अनुकरण केले नाही. म्हणूनच मर्ढेकरांनी म्हटले आहे की, '' मराठी साहित्य व भाषा परपृष्ठ असले तरी पुरेसे परपृष्ठ नाही '' (साहित्य आणि सौंदर्य) - **मर्ढेकर पृष्ट १४०**) मराठी काव्याच्या विकासाचा मागोवा घेताना आपणास मर्ढेकरांच्या आक्षेपाचा प्रत्यय येतो. अपवाद फक्त हायकू या काव्यप्रकाराचा. जपानी भाषेतील हा काव्यप्रकार मराठीत आणण्याचा १९७९ मध्ये शिरीष पैयांनी केला. हा नवा आणि एक चांगला काव्य प्रकार असून मराठीत त्याचा फारसा प्रचार किंवा प्रसार झाला नाही. फार थोड्या कवींनी 'हायकू ' या काव्यप्रकारात रचना करण्याचा प्रयत्न केला. कारण, या काव्यप्रकाराची चर्चा 'सत्यकथा' या मासिकातून झाली. आणि हे मासिक वाङमयीन क्षेत्रातील मर्यादित लेखक वाचक यांच्यापुरतेच मर्यादित होते. तसेच ' 'हायकू ' हा काव्यप्रकार काहीसा बंदिस्त असल्याने त्यामध्ये काव्य रचना करताना ही तारेवरची कसरत होती. त्यामुळे झटपट अनुकरण करणाऱ्या प्रसिध्दी मिळवू इच्छिणाऱ्या कवी व वाचकांपर्यंत गेली नाही. वास्तविक पाहता हा एक चांगला काव्यप्रकार आहे. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत या काव्यप्रकाराचे खास असे वैशिष्ट्य होते. सामान्य वाचक व कवीपर्यंत चर्चा गेली असती तर मराठीत उत्कृष्ठ प्रकारची रचना झाली असती असे वाटते. म्हणूनच या एका महत्वपूर्ण काव्यप्रकाराचा त्याच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.

## हायकू : ऐतिहासिक परंपरा -

' हायकू ' या काव्यप्रकाराचा जन्म १५ व्या शतकात जपानमध्ये झाला. 'हायकू ' अस्तित्वात येण्यापूर्वी 'तांका ' आणि 'रेंगा' हे काव्यप्रकार अस्तित्वात होते. ' तांका ' हा काव्यप्रकार पाच ओळींचा असून त्यातील पहिल्या तीन ओळींना 'होक्कू ' म्हणण्यात येत असे. तांका म्हणजे दोन कवींच्या प्रतिभेची सामूहिक क्रीडा. पहिल्या तीन ओळीत एका कवीने रचावयाचा तर पुढील दोन ओळी दुसऱ्या कवीने रचावयाचा : एका दृष्टीने हा समस्यापूर्तीचा प्रकार असे.

तांका,रेंगा,आणि हाईकाई ह्या तीनही काव्यप्रकारातल्या पहिल्या तीन ओळींना म्हणजेच होक्कूला पुढे असामान्य महत्व प्राप्त झाल्याने उत्तरोत्तर ह्या तीन ओळींनाच स्वतंत्र काव्यप्रकाराचे रुप धारण केले. पंधराव्या शतकातच होक्कूला ' हायकू ' हे अभिधान प्राप्त झाले. मात्र हायकू ह्या काव्यप्रकाराला आजचे संपन्न स्वरुप प्राप्त करुन देण्यात जर कुणाचे परिश्रम कारणीभूत झाले असतील तर ते सतराव्या शतकातील ' बाशो ' ह्या कवीचे पंधराव्या शतकात पूर्वीची जपानी कविता ही विदग्ध, ग्रांथिक भाषेत लिहिली जात होती. व राजदरबारातून वावरत होती. परंतु पंधराव्या शतकापासून बोली भाषेच्या वापरामळे ती सामान्य जनांपर्यंत जाऊन पोचली. बाशोने (१६६४ - ९४) हायकूमधून प्रथमत: बोली भाषेचा सर्रास वापर करण्यास प्रारंभ केला. हायकूला त्याचा असा,स्वतंत्र आकृतिबंध बाशोनेच प्राप्त करुन दिला. विषयाचे व आविष्काराचे पूर्ण स्वातंत्र्य घेऊन बाशोने खऱ्या अर्थाने 'हायकू'ही जनतेची कविता बनविली. बाशोला पुष्कळ अनुयायी लाभले. जपानी कवींनी त्याला बहुमान दिला.

तांका,रेंगा आणि हाईकाई ह्या तीनही काव्यप्रकारांमध्ये पहिल्या तीन ओळींना

महत्व असल्याने या तीन ओळीनीच स्वतंत्र काव्यप्रकाराचे रुप धारण केले. १५ व्या शतकात होक्कूला 'हायकू 'ही उपाधी प्राप्त झाली.

' हायकू ' हा काव्यप्रकार स्थिर करण्यात आणि लोकप्रिय करण्यात' बाशो ' या कवीचा फार मोठा वाटा असल्याने आजच्या हायकूचा जनक असे म्हटले जाते. त्याने नवीन रचना केली. त्याहीपेक्षा ती रचना बोली भाषेत केली. त्यामुळे ती रचना सर्वसामान्य जनामध्ये लोकप्रिय झाली. म्हणून शिरीष पै यांनी म्हटले आहे की, '' हायकूला त्याचा असा स्वंतत्र आकृतीबंध बाशोनेच प्राप्त करुन दिला. '' विषयाचे आणि आविष्काराचे पूर्ण स्वातंत्र्य घेऊन बाशोने खऱ्या अर्थाने हायकू ही जनतेची कविता बनविली. त्यामुळे त्याच्या या लोकप्रिय काव्य प्रकाराचे जपानमधील अनेक कवींनी अनुकरण करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये 'बुसन ' (१७५० - ८३) ' इस्सा ' (१७६३ - १८२७) या प्रतिभाशाली कवीने या काव्यप्रकाराला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. त्यानंतर ' शिकी ', ' सुरुकी ', ' सीसेकी ', अशा अनेक कवींनी त्यात उल्लेखनीय भर घातली. पण शिरीष पै यांनी म्हटल्याप्रमाणे '' बाशो - बुसन - इस्सा या तीन कवींचा उल्लेख हायकूच्या संदर्भात ' पवित्रत्रयी ' असा केला जातो. या तिघांकवीमुळे हायकूला दर्जा आणि लोकप्रियता लाभली. १५ व्या शतकापासून सुरु झालेली परंपरा आजही अस्तित्वात असून जपानमध्ये आजही लोकप्रिय काव्यप्रकार आहे.

हायकूच्या काव्यरचनेवर प्रभाव पडणारा एक महत्वाचा घटक म्हणजे ' झेन तत्वज्ञान'. झेन हा फार मोठा तत्वचिंतक होता. या संदर्भात शिरीष पैनी दिलेली माहिती अर्थपूर्ण वाटते. त्यांनी म्हटले आहे, '' '' झेन तत्त्वात आताच्या क्षणाला अत्यंत महत्व आहे. ' आता ' आणि ' इथे ' हे दोन शब्द झेनपंथीय संपूर्ण अस्तित्वाचेच निदर्शक म्हणून वापरतात. व्यक्ती जिथे आहे तिथे आणि त्याच क्षणी पूर्ण जागृत होताच सर्वत्र भरुन राहिलेल्या

या परम चैतन्याचा स्त्रोत्र तिला जाणवतो. मात्र पूर्ण जागरुकता यायला हवी. वस्तू जशी आहे. तशी, त्याच स्वरुपात पहावयाला, तिच्या अस्तित्वाचा वेध घेता यायला हवा. ह्याखेरीज, मनुष्य आणि निसर्ग ह्यांची पूर्ण एकरुपता हाही झेन तत्वातील दुसरा महत्वाचा विचार आहे. जीवनातील सगळ्या आकारांत एक साधर्म्य आहे. सगळ्यांचे मूळ एकच आहे. त्याच्या त्या गूढ स्वरुपाचा साक्षात्कार जेव्हा कवीच्या संज्ञेला होतो, तेव्हाच कवी हायकूतून प्रत्यक्षपणे वर्णन असा कोठेच केलेला नसतो. तो निश्चित काय आहे तेही उघड केलेले नसते. फक्त काही वस्तूंच्या उल्लेखातून तो सुचविलेला आहे. जणू तो त्या वस्तूच्या आड लपलेला असतो. हायकू वरकरणी भासतो एक; पण ध्वनित अर्थ वेगळाच असतो. वर दिसते ते दृश्य एक आणि त्यातून प्रकट होणारा, त्या दृश्यापलीकडे अथांग पसरलेला जीवनाचा अर्थ दुसराच.

बाशोच्यानंतर हायकूच्या विकासाला बुसन (१७१५ - ८३) ह्या कवीने प्रामुख्याने हातभार लावला. अर्थात बुसनचा हायकू हा जरा उच्चभ्रू समाजासाठी लिहिलेला असून अलिप्तता आणि उत्कृष्ट कारागिरीही बुसनच्या हायकूची वैशिष्ट्ये आहेत. बुसननंतर इस्सा (१७६३ - १८२७) ह्या कवीचा प्रामुख्याने उल्लेख करायला हवा. इस्सा हा दुर्दैवाचे तडाखे खाऊन दु:खी झालेला कवी होता. त्यांच्या हायकूत मृत अपत्यांचे भीषण दारिद्र्याचे, कीटक मित्रांचे उल्लेख वरचेवर येतात. बांशो - बुसन - इस्सा ह्या तीन कवींचा उल्लेख हायकूच्या संदर्भात 'पवित्र - त्रयी' असा केला जातो.''

जपानी लोकांचे निसर्ग प्रेम, काव्यप्रेम बौध्दतत्व - ज्ञान - प्रेम, या सर्वातून हायकू या काव्य प्रकाराचे अंतरंग व बहिरंग सजत गेले. त्यांनी रचना केली. त्याची चर्चा केली. आणि त्यातूनच मराठीत या काव्यप्रकाराचे आगमन झाले. शिरीष पै यांच्या नंतर, सुरेश

मथुरे, शांता शेळके या कवींनी ' हायकू ' काव्यप्रकारात रचना केली. आणि त्या काव्यप्रकाराची चर्चाही केली. त्यातूनमराठीत हायकू हा काव्य प्रकार आविष्कृत होऊ लागला. परंतु ' हायकू ' या काव्यप्रकाराचे नेमके स्वरुप व वैशिष्ट्य फ़ारच थोड्यांना आकलन झाल्याने हायकूसदृश्य रचना निर्माण झाली. परंतु खऱ्या अर्थाने फार थोड्या कवींनी हायकूच्या अस्सल स्वरुपात रचना केली. हायकू या काव्यप्रकाराची रचना कमालीची बंदिस्त असल्याने आणि त्यात निसर्गातील घटनेला अत्यंत महत्व असल्याने अनेकांना अनुकरण करता आलेले नाही. प्रस्तुतच्या लघुप्रबंधाच्या चर्चेतून हायकूचे नेमके स्वरुप स्पष्ट होईल असा विश्वास वाटतो.

**हायकूचे तंत्र आणि मंत्र :**

'हायकू' हा जपानी काव्यप्रकार आणि त्याची वैशिष्ट्ये मराठीत आणण्याचा प्रयत्न शिरीष पै यांनी केला. हायकू ह्या काव्यप्रकाराच्या तंत्राची चर्चा प्रथमत: त्यांनीच केलेली आहे. त्यांनी म्हटले आहे, '' जपानी हायकूमधल्या तीन ओळी पहिल्या ओळीमध्ये सात आणि तिसऱ्या ओळीमध्ये पाच अशा शब्दांचे उच्चाराप्रमाणे गट पाडलेले असते त्याला 'शब्दावयव 'म्हणतात. यमक पहिल्या आणि तिसऱ्या किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत येते '' परंतु जपानी भाषा ही चित्रालिपीची असल्याने त्या भाषेतील वाक्यरचना आपल्यापेक्षा वेगळी असते. त्यामुळे मूळ जपानी भाषेच्या तंत्राचे मराठीत अनुकरण करता येत नाही. म्हणून त्यांनी म्हटले आहे, '' मूळचे जपानी वृत्त मात्र मराठीत आणता येणार नाही. तसे करु गेल्यास तो एक हट्टाहास आणि शब्दांची ओढाताण ठरेल आणि त्या हायकूतले अंतर्गत सौंदर्य आपण गमावून बसतो. या दृष्टीने हांयकूच्या अर्थाचा मराठीत अनुवाद करावा लागतो. वृत्तानुसार शब्दश: तो करता येणार नाही .......

--- वृत्ताचे तंत्र सांभाळता आले नाही तरी तीन ओळीच्या रचनेचे यमकाचे शब्दांच्या नेमकेपणाची आणि अचूकपणाचे आणि अंतर्गत भावलयीचे, तोलाचे तंत्र आपण सांभाळू शकू आणि त्या योगे हायकूतील अमूर्तभाव आपण अनुवादात जशाचा तसा तितक्याच तीव्रतेचे आणू शकू ..... रचनेत हायकू वृतबध्द न करता मुक्तच असू द्यावे. त्यामुळे हायकूत मोकळेपणा व सहजता राहील. मात्र शब्दांची निवड अगदी अचूक, मोजकी आणि आवश्यक तितके शब्द ठेवून रचना करावी म्हणजे मराठी हायकूतही जपानी हायकूचा बंदिस्तपणा कायम राहिल, '' २

शिरीष पै यांचे विवेचन योग्य वाटते परंतु काही समीक्षकांनी यावर आक्षेप घेतला आहे. श्री. बबन सराडकर यांनी आक्षेप घेताना म्हटले आहे की, '' शिरीष पै यांनी

जपानी हायकूचा मराठी अनुवाद करताना त्यात हायकू वृत्ती जोपासली आहे का ? त्यांच्या अनुवादात शब्दांवयांचे कुठलेही बंधन दिसत नाही. एका ओळीचा अर्थ एका ओळीत बंदिस्त करुन तीन ओळीच्या हायकूसाठी तीन ओळीत अर्थ सांगण्याचे तंत्र त्यांनी वापरले आहे एवढेच !"[५] या संदर्भात त्यांनी शिरीष पैच्या अनुवादातील एक उदा. दिले आहे. मूळ जपानी हायकू खालीलप्रमाणे आहे.

'' कुबाकी ओची
तोरानाकी त्सुबाकी
माता ओचिक ''

- बाईशित्सु

या जपानी हायकूने पहिल्या ओळीत पाच अक्षरे दुसऱ्या ओळीत सात अक्षरे आणि तिसऱ्या ओळीत पाच अक्षरे आहेत. या हायकूचे शिरीष पै योनी खालील प्रमाणे मराठी अनुवाद केला आहे.

गळून पडले फूल कॅमेलियाचे
तेव्हा कोंबडा आरवला
आणि दुसरे गळून पडले

या अनुवादात '' पाच - सात - पाच हा क्रमवार नाहीच. पण एकंदर सतरा शब्दावयात तरी हा अनुवाद बांधता आला का ? तसे झाले असते तर त्याला हायकूचा अनुवाद म्हटले असते. केवळ अर्थ आणि आशयाचे सौंदर्य कायम राखल्याने मूळ कवितेचा अनुवाद साधला जात असतो का ? '' या शब्दात त्यांनी शिरीष पै यांच्या अनुवादावर टीका केली आहे. त्या संदर्भात

पुढे त्यांनी म्हटले आहे, '' केवळ सतरा शब्दावयांद्वारे एखादे भावविश्व उभे करणे, एखाद्या अनुभूतीची अभिव्यक्ती करणे किती विलक्षण आहे ' आणि म्हणूनच अतिशय मोजक्या शब्दांद्वारे हायकू लिहिणे खूप खूप अवघड आहे.. इतक्या सूक्ष्म अनुभवातून, मोजक्या शब्दातून केली गेलेली कविता ' हायकू ' तिचा अनुवाद जर त्याच तोलामापाने केला गेला नाही तर त्या अनुवादात कुठले सामर्थ्य उरले ? '' श्री सराडकर यांचे हे विवेचन सदोष वाटते या विवेचनातून असे दिसून येते की, श्री सराडकर हे तंत्राचे अंग फार मानतात. या संदर्भात श्री. सुरेश मथुरे यांनी शिरीष पै यांच्या हायकू तंत्राच्या विवेचनावर कांही आक्षेप केले आहेत. त्यांनी म्हटले आहे, शिरीष पै यांचे सर्वच हायकू अथवा तदृश्य कविता ही मुक्त छंदात्मक आहे. आद्य जपानी हायकू ५, ७, ५ अशा विषम घाटाचा, तीन ओळींचा असतो. त्यामुळे हायकूवरचे पै चे संपूर्ण विवेचन आवडले तरी हायकूची उदा. पाहून मन गोंधळून गेले. हायकू हा काव्यप्रकार मराठी मातीत स्वतंत्रपणे रुजावा असे वाटत असेल तर त्याची जी काही गुणवैशिष्ट्ये आहेत, त्यासह तो तरलपणे अवतरायला हवा. इतक्या सफाईने तो त्याच्या आकृतिबंधासह यायला हवा की, मराठी न जाणणाऱ्या जपानी माणासनेही केवळ त्याचा छापील आकृबंध पाहून ' हा हायकू आहे ' असे म्हणायला हवे. अन्यथा या प्रकाराने इतर मराठी छोट्या कवितेच्या विश्वात एकतान होऊन जायला हवे; हायकू हे बिरुद किंवा बुरखा तिथे दिसता कामा नये. यासाठी हायकू काव्यप्रकाराची काही गुणवैशिष्ट्ये सांगता येईल.

१) निसर्गातल्या तरल सौंदर्याची बंदीश करतो आणि तितक्याच उत्कटतेने तो त्या बंदिशाचे रसिकाला रसपान घडवतो.

२) ही सौंदर्याची बंदीश अल्पाक्षरातून होते. नेमक्या भाषेत म्हणजे १७ शब्दावयातून ती होत असते.

३) या बंदिशीचा बाह्य घाट तीन ओळींचा ५, ७, ५ या अनुक्रमाने बांधीव असा असतो.

४) ऋतू - कालमानालाही हायकूने स्पर्श करायला हवा.

५) हायकूत एखादे यमक, एखादी सुप्त लय असायला हवी.

६) जपानी सेन्सिबिलिटी परिस - स्पर्शही हवा.

त्यांच्या मते, '' सतरा अक्षरांची म्हणजे शब्दावयवाची रचना लक्षात घेतली तर मात्र हायकूचे स्वयंभू अस्तित्व नजरेसमोर येऊ शकते. परंतु मराठी भाषेच्या अड चणीमध्ये अशी अक्षररचना करणे क्लिष्ट जाते. इथे भाषेच्या ज्या काही अड चणी असतील त्या सोड विण्यासाठी पाच - सात अशी रचना स्विकारुन आपण हायकूचे 'तंतोतंत ' प्रतिबिंब ' या काव्य प्रकाशन उमट वू शकतो आणि अशा प्रतिबिंबांतून हायकू हा इतर मराठी छोट्या कवितापासून वेगळा आहे हे सुचवू शकतो. '' [८] श्री सुरेश मथुरे यांचे हे विवेचन चिंत्य आहे.

१) शिरीष पै यांची रचना मूळ जपानी हायकूप्रमाणे पाच - सात - पाच अशा अक्षरात नाही. म्हणून ते आक्षेप घेतात आणि त्याऐवजी सात - नऊ - सात अशी रचना स्त्रिकारण्याची कल्पना सूचवितात हे मूळ विचाराशी विसंगत आहे. सात - नऊ - सात अशी अक्षर रचना करण्यास मूळ जपानी हायकूचा आधार आहे का ? येथे त्यांनी काहीसे स्वातंत्र्य घेण्याचा प्रयत्न केला मग असे स्वातंत्र्य

शिरीष पै यांनी आपल्या पध्दतीने घेतले म्हणून काय बिघड ले ? त्यांच दुसरे विधान महत्वाचे वाट ते. कारण त्यात त्यानी त्यांनाही न कळत शिरीष पै यांच्या महत्वाच्या विधानाला संमती दिलेली आहे. या लेखात त्यांनी म्हट लेले आहे, '' एका बाजूने जपानी सौंदर्यासक्त संस्कृतीच्या सांस्कृतिक ठेव्याचा प्रचंड मोठा लाभ पाठीशी घ्यायचा आणि दुसऱ्या बाजूने अल्गद सोपी पळवाट काढू न जायचे हे काहीं वाजवी वाट त नाही. त्यात रसिकता, सौंदर्यलोलुपता येत असेलेही. पण जपानसारख्या आद्योगिक आणि सौंदर्यात्मक अशा परस्परविरोधी ध्रुवांवर प्रगत असलेल्या राष्ट्र ाचा ठे वा घ्यावयाच तर तो त्याच्या सर्व गुण वैशिष्ट्यांसह स्वीकारुन त्याची तितक्याच निष्ठे ने, नाजूकपणे जपणूक करायला हवी. त्यातच साधना आहे. हायकूवृत्तीही अर्थात सर्वच हायकूंची जपणूक अशा तऱ्हेने करता येणार नाही. हे मान्य.'' १

शिरीष पै यांचे हेच म्हणणे आहे, त्यांनी म्हट ले आहे की, ''परंतु मूळचे जपानी वृत्त मात्र मराठीत आणता येणार नाही. तसे करुन गेल्यास तो एक अट्टाहास आणि शब्दांची ओढाताण ठरेल आणि त्या हायकूतले अंतर्गत सौंदर्य आपण गमावून असू. या दृष्टीने जपानी हायकूच्या अर्थाचाच मराठीत अनुवाद करावा लागेल. वृत्तानुसार शब्दश: तो करता येणार नाही. आधीच जपानी भाषा आपल्याला येत नाही. तिच्या इंग्रजी अनुवादावरुनच आपण मूळ जपानी हायकू बरहुकूम जसाच्या तसा कसा करता येईल ? पण

त्यामुळे निराश होण्याचे कारण नाही. अनुवादातही मूळ काव्याचे मर्म आपण हरवू दिले नाही तर आपला अनुवाद यशस्वी झाला असे म्हणता येईल. वृत्ताचे तंत्र सांभाळता आले नाही तरी तीन ओळीच्या रचनेचे, यमकाचे, शब्दांच्या नेमकेपणाचे आणि अचूकपणाचे आणि अंतर्गत भावलयीचे, तोलाचे तंत्र आपण सांभाळू शकू आणि त्यायोगे हायकूतील अमूर्त भाव आपण अनुवादात जसाच्या तसा तितक्याच तीव्रतेने आणू शकू.

मराठीतून स्वतंत्र हायकू लिहिताना आपण वर उल्लेखिलेली अन्य तंत्र सांभाळावीत. पण रचनेत हायकू वृत्तबध्द न करता मुक्तच असू द्यावा. त्यामुळे हायकूत मोकळेपणा आणि सहजता राहील. मात्र शब्दाची निवड अगदी अचूक, मोजकी आणि आवश्यक तितकेच शब्द ठेवून रचना करावी. म्हणजे मराठी हायकूतही जपानी हायकूचा बंदिस्तपणा कायम राहील.

उदा. - इतक्या वेगानं गाडी पुढं गेली
रस्त्यावर उमललेली रानफुलं
डोळे भरुन पहाताही नाही आली.

ह्या हायकूत एक वृत्त सोडून हायकूचे बाकीचे सर्व नियम पाळलेले आहेत. तरीही त्या हायकूच्या परिणामकारकतेला कुठे बाधा आलेली नाही. मात्र मराठी भाषेमध्ये हायकू सदृश्य रचना निर्माण होण्याची बरीच शक्यता आहे.

उदा. - ठाऊक आहे तुला
तुझ्या दिशेनं आधी झुळुक येईल.
तरी प्रत्येक कळीचं फूल होईल !

ह्या हायकूत रचनेचे बरेचसे नियम पाळले गेले आहेत. तरीपण तो शुध्द हायकू नाही. इथे कुठलेच शुध्द चित्र वा वस्तू शब्दातून उभ्या केलेल्या नाहीत. उभा केला आहे तो नुसता भाव, शिवाय रुपक अलंकार वापरला आहे. सरळपणे उघड पणे व्यक्तिगत भावना प्रगट झाल्या आहेत. मग अशा काव्यरचनेला हायकू म्हणावा का ? '' १०

'' हायकू रयनेत हायकू वृत्तीला महत्व आहे ''

अशा प्रकारची चर्चा परकीय भाषेतून येणाऱ्या काव्यप्रकाराच्या संदर्भात झाली आहे. इंग्रजीतील " Sonet " हा काव्यप्रकार मराठीत आणताना मराठीने संस्कृतमध्ये शार्दुलविक्रिडीत हा अक्षरगणवृत्तांचा रचना प्रकार वापरला आणि यशस्वीरित्या रचना केल्या. त्यामुळे बिघडले कोठे ? अशी चर्चा अरबी, फारसीतून आलेल्या गझल या काव्यप्रकाराबद्दल झाली आहे. हे विशिष्ठ प्रकारचे वृत्त आहे. परंतु मराठी भाषा ही अरबी, फारशी भाषेपेक्षा वेगळी असते. मराठीतील गझल कवींनी जातिवृत्ताचा आधार घेऊन रचना केली. तेव्हाही काही लोकांनी मराठी गझल कवितेत अरबी फारसीचे वृत्त वापरु नये असा आक्षेप घेतला आहे. या संदर्भामध्ये डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी आपल्या संशोधनपर पुस्तकात म्हटले आहे -

'' गझल काव्याच्या टीकाकारांप्रमाणे असा रोख आहे की उर्दू - फारसीसारखी गझल मराठीत निर्माण झालेली नाही व होणार नाही. परंतु हा आक्षेप तपासून घेतला पाहिजे. - - - -- -- कोणत्याही वाङमयप्रकाराचे देश, भाषा व संस्कृती यांच्याशी एक निकटवर्ती नाते असते. त्यामुळे प्रत्येक भाषेचे साहित्य हे स्वतंत्र, वेगळे असते, फारसी गझल ही इराणमध्ये सूफी पंथियांनी निर्माण केली व ती उर्दू भाषेत हिंदुस्थानात विकसित पावली. मोंगलाच्या विलासी वातावरणात तिचा प्रवेश झाला. म्हणजे गझल निर्माण झाली ती समाज, ती भाषा व तो कालखंड मराठी भाषा व समाज यापेक्षा अनेक बाबतीत वेगळा होता. त्यामुळे

मध्ययुगीन उर्दू गझलकाव्य व आधुनिक मराठी गझलकाव्य या दोहोंत भिन्नता राहणे अगदी स्वाभाविक आहे आणि ही भिन्नता राहणे अगदी स्वाभाविक आहे आणि ही भिन्नता आपण स्वीकारलीच पाहिजे. ..

. . . दुसरी गोष्ट की एखाद्या भाषेतील वाङमयप्रकार दुसऱ्या भाषेत अनुकरणाने येतो. हे अनुकरण बाह्यांगाचे व अंतरंगाचे असते. परंतु ते मुळातल्या वाङमयप्रकाराशी तंतोतंत जुळणारे असू शकत नाही. म्हणून दुसऱ्या भाषेतील वाङमयप्रकार आणू नयेत असे म्हणता येणार नाही. विविध भाषांतील वाङमयीन प्रवाहांना आपल्यात सामावून घेऊन एखाद्या भाषेतील वाङमयीन प्रवाह समृध्द होत असतो. अनुकरणाची ही प्रवृत्ती सार्वत्रिक आहे. म्हणून अनुकरणशीलता ही आक्षेपार्ह नाही. अर्थात हे अनुकरण मुळापेक्षा काही अंशी भिन्न होणे स्वाभाविक असते. भाषांतराच्या संदर्भात म्हटले आहे की, 'एका बाटलीतून दुसऱ्या बाटलीत अत्तर ओतताना त्याचा थोडा गंध उडून जातोच.' परकीय वाङ्मयप्रकाराच्या बाबतीतही हे खरे होते. मराठीने अनेक परकीय वाङमयप्रकार यशस्वीरीत्या आत्मसात केले आहेत. त्यामुळे गझलचे अनुकरण करता येणार नाही व तो प्रकार रुजणार नाही असे म्हणता येणार नाही. मराठी मातीत गझल रुजली तर तिचा रंग व गंध मराठीतच राहणार, राहावा हे योग्य.'' परकीय भाषेतून मराठीत एखादा काव्यप्रकार आणताना असा बदल होणे हे स्वाभाविक असते कारण प्रत्येक वाङ्मय प्रकार हा त्या संस्कृतीशी संबंधीत असतो. त्यामुळे तंतोतंत अनुकरण करणे अवघड असते. म्हणून अभिव्यक्तीपेक्षा आशयाला महत्व देणे योग्य ठरते. त्या दृष्टीने पाहता असे म्हणावे लागेल की, गझल प्रमाणे हायकूच्या बाबतीतसुध्दा वृत्तापेक्षा वृत्तीला अधिक महत्व आहे.

# प्रकरण पहिले

## संदर्भ - सूची


१) मर्ढेकर बा. सी. - ' वाङ्मयीन महात्मता '
' सौंदर्य आणि साहित्य '
पृ. क्र. १४०

२) पै शिरीष - प्रस्तावना - ' हायकू ' - पृ. २ - ३

३) पै शिरीष - प्रस्तावना - ' ध्रुवा ' - पृ. क्र. ९ - १०

४) पै शिरीष - प्रस्तावना - ' हायकू ' - पृ. १२ - १४

५) सराडकर बबन - ' हायकू - चर्चा '
सत्यकथा एप्रिल १९८१ ' पृ. ३३

६) सराडकर बबन - ' हायकू - चर्चा '
सत्यकथा एप्रिल १९८१ ' पृ. ३३

७) सराडकर बबन - ' हायकू - चर्चा '
सत्यकथा एप्रिल १९८१ ' पृ. ३३

८) मथुरे सुरेश - ' हायकू - चर्चा ' सत्यकथा —

९) मथुरे सुरेश - ' हायकू - चर्चा ' सत्यकथा —

१०) पै शिरीष - ' हायकू ' पृ. १३ - १४

११) हिरेमठ राजशेखर - गझल : रंग आणि गंध, पृष्ठ ७७